# सुची


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | १ ते ५ |
| २) | विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ६ ते ७ |
| ३) | विभागीय कार्यालयाची रचना | ८ ते ११ |
| ४) | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | १२ ते १३ |
| ५) | विभागीय कार्यालया अंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण | १४ ते १५ |
| ६) | विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरिक्षतता | १६ |
| ७) | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी | १७ ते १८ |
| ८) | सनदेची अमंलबाजावणी व प्रतिसाद | १९ |
| ९) | परिशिष्ट अ, ब, क, ड, इ | २० ते २८ |

## १. प्रस्तावना

ठाणे जिल्हा मुंबई या आर्थिक राजधानी असलेल्या नगरीशी जोडून असल्यामुळे भौगोलिकदृष्टया त्यास अनन्य साधारण महत्व आहे. महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्हयाचे स्थान हे साधारणतः मुंबईच्या वायव्य दिशेस असून ठाणे जिल्हयाच्या पूर्वेस नाशिक व अहमदनगर जिल्हा आहेत. दक्षिणेस पुणे जिल्हा आहे. नैऋत्येस मुंबई उपनगर जिल्हा आहे. पश्चिमेस अरबी समुद्र आहे. तर जिल्हयाच्या उत्तरेस गुजरात राज्य व दादरा नगर हवेली केंद्रशासीत प्रदेश आहेत. सा. बां. मंडळ, आवार, स्टेशन रोड, ठाणे (प.) ४०० ६०१ या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे हे कार्यालय कार्यरत असून ठाणे जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग विषयक सेवेबद्दल नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे ही बांधिलकी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ ठाणे या सनदेव्दारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागा विषयीचे हक्क त्यांच्या पर्यंत प्रगतीच्या विकासाच्या वाटेने अतिशय सुलभतेने पोहोचविण्याचा हा ध्यास आहे.

त्यामुळे ठाणे जिल्हयातील राष्ट्रीय महामार्गाचा विकास, प्रगती व नागरिकांचे प्रश्न याचा विचार करुनच ही सनद तयार करण्यात आली आहे.

१) आपल्या भारत देशाची धमणी समजले जाणारे व विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे राष्ट्रीय महामार्ग अतिशय उत्तम दर्जाचे करणे.

२) विभागाच्या कार्यक्षेत्रातंर्गत असलेल्या राष्ट्रीय महामार्गाशी निगडीत इमारती, राष्ट्रीय महामार्ग व त्यावरील पुलांची नियतकालिक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून करणे.

३) विभागीय कार्यालयात व विभागाचे अखत्यारितील सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

४) विभागाच्या कार्यक्षेत्रात जनहितार्थ उद्‌भवणा-या आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकीशी संबंधीत व जनहितार्थ आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

५) विभागाच्या कार्यालयात व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

६) विभागाच्या कार्यालयात व विभागीय कार्यालयाचे अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

७) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विभागांतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे बाबत सक्षम स्तरावर तत्पर कार्यवाही होणे.

८) विभागीय कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून, विभागीय कार्यालयाचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे लोकभिमुखता वाढविणे.

९) संगणीकरणाबाबत विभागीय कार्यालय, सर्व विभागांतर्गत उप विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे.

१०) विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www. mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

११) विभागांतर्गत येणा-या सर्व विषयाची अनुसूची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१२) विभागीय कार्यालय व अखत्यारितील सर्व कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यायावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यायावत करणे.

१३) विभागाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता आणणे व गतिशिल प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे.

१४) नागरिकांच्या प्रश्नांची व विभागाशी संबंधित असलेल्या विषयाची माहिती व केलेली कार्यवाही नागरिकापर्यंत पोहाचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.

१५) विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे ग्रामपंचायत स्तरापासून ते विधानसभेच्या, लोकसभेच्या प्रतिनिधींपर्यंत त्यांना आवश्यक असलेली माहिती त्वरित पुरविणे व जनसंपर्क ठेवणे.

१६) विभागांतर्गत व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साहित वातावरण ठेवणे.

१७) दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्वल करणे.

१८) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २. विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

### १. विभागीय कार्यालयाची बांधिलकी :-

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना (राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे)

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

### २. <u>नागरिकांची जबाबदारी :-</u>

- शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दुर करावीत व पुनःसरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहील.

- नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## २. **विभागीय कार्यालयाची रचना**

मुंबई सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत अधीक्षक अभियंता, ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे यांचे कार्यालय असून त्यांचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा आहे. ठाणे (सा.बां.) मंडळाचे क्षेत्रिय अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्त्याखाली व त्याच्याच कार्यालयाच्या आवारात कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३ हे कार्यरत आहेत. कार्यकरी अभियंता यांचे अधिपत्त्याखाली तीन उप अभियंता कार्यरत असून, सर्वसाधारणपणे उपअभियंत्यांकडे असलेल्या कार्यक्षेत्राची माहिती परिशिष्ट - ब (अनेक्चर बी) मध्ये दिली आहे.

या विभागीय कार्यालयाकडे ठाणे जिल्हयांतील राष्ट्रीय महामार्गाचे कार्यक्षेत्र आहे. विभागाचे मुख्यालय ठाणे येथे आहे. कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील बांधकाम विभाग हेच ख-या अर्थाने माहितीचे स्त्रोत आहेत. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरवातीपासून अशी संबंधीत कार्यकारी अभियंता तसेच उप विभागीय अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते.

प्रस्तावनेत नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. विभागांतर्गत कामांच्या अमंलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिका-यांकडून केले जाते.

## ४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र :-

ठाणे सा. बां. मंडळांतर्गत राज्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग, व दर्जेनिहाय लांबी व सदर रस्त्यांवर येणारे लहान व मोठे पुल यांची सुची परिशिष्ट क प्रमाणे सोबत जोडण्यात येत आहे. मंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग क्रमाक २२२ कि. मी. ५/००० ते कि. मी.९५/५७० हा भाग येतो. पैकी कि.मी. ५/००० ते कि. मी. ९/३०० ही २३.०० कि. मी. लांबी कल्याण डोंबिवली महानगर पालीकेकडे सुधारणा देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत झालेली आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग ३ कि. मी. ५३९/५०० (वडपे) ते ५६३/००० (माजिवडा) ही २३.५ कि. मी. लांबी खाजगीकरणांतर्गत १३ मे २०१७ पर्यंत आय. आर. बी. या उदयोजकाकडे आहे, व हा राष्ट्रीय महामार्ग व त्यावरील पूल ४ पदरी रुंद केल्याच्या बदल्यात त्याना पथकर वसूली हक्क दिलेले आहेत.

## ५. विभागीय कार्यालयांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगी करण.

### अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक

विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती तसेच रस्ते, पूल व इमारती आणि इतर कामांविषयीची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट ड) नमूद केली आहे. अर्जाचा विहीत नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

### ब) माहितीची सुलभता

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www. mahapwd. com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या मंडळांतर्गत माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

### क) खाजगीकरण

खाजगीकरणांतर्गत या विभागांतर्गत वरील अ. क्र. ४ येथे नमूद केलेला १ प्रकल्प पूर्ण झाला आहे.

## ६. गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी

### अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपुर्तीस होणारा विलंब व अन्य काही गा-हाणी या कार्यालयाच्या अखत्यारितील कार्यालयाबाबत अथवा या विभागाच्या काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उप विभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गा-हाणे मांडावे.

नागरीक त्यांची गा-हाणी पत्राने वा ई-मेल व्दारेही नागरिक मांडू शकतात.

विभागाचा ई मेल आयडी : nh3thane. ee @ yahoo. co. in

मंडळाचा ई मेल आयडी : thane. se @ mahapwd. com

## ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे या कार्यालयाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा विभागांतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येईल.

## क) जनसामान्यांकडून सुचना

राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे या कार्यालयाची नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यासेवा उपभोगणा-या नागरिकांना चांगल्या सुविधा मिळविण्यासाठी मदत करते.

## ७.	नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ठाणे (सा. बां.) मंडळ, ठाणे कार्यालयाच्या या नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी दि. २८ मे २००७ पासून करण्यात आली असून त्या अंतर्गत या कार्यालयाचा समावेश आहे. या कार्यालयाची नागरिकांची सनद पुनश्च अदयावत करुन ती आता नव्याने पुन्हा प्रसिध्द करण्यात येत आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३ ठाणे खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. मंडळाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण् मदत करण्याच्या भावनाने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रीत सेवेची उद्यिष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरित प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाव्दारे नविन तंत्र वापरुन ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्याची बांधीलकी राहील. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यात येईल.

८.	परिशिष्टे

अ)	मुख्यालय तसेच विभागांतर्गत माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी दर्शविणारा तक्ता व वृक्षतक्ता

ब)	कार्यक्षेत्राचा नकाशा जोडला आहे.

क)	कार्यक्षेत्रातील दर्जेनिहाय लहान / मोठे पूल यांची सूची

ड)	कार्यपूर्तीचे वेळापत्रक.

इ)	राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ दर्शविणारे नकाशे. (क्रिटीकल रिव्हयू)

# परिशिष्ट अ

## विभागाचा तक्ता

| | | |
|---|---|---|
| विभागाचे मुख्यालय<br>कार्यकारी अभियंता<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग<br>स्टेशन रोड, पी.डब्ल्यू. कंपाऊंड<br>क्रमांक ३, ठाणे.<br>पीन कोड क्र. ४००६०१ | विभागांतर्गत शासकीय जन माहिती अधिकारी<br>उप कार्यकारी अभियंता,<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग<br>स्टेशन रोड, पी.डब्ल्यू डी. कंपाऊंड<br>पीन कोड क्र. ४००६०१ क्रमांक ३, ठाणे | शासकीय जन अपिलिय अधिकारी<br>कार्यकारी अभियंता,<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग<br>स्टेशन रोड, पी.डब्ल्यू डी. कंपाऊंड<br>पीन कोड क्र. ४००६०१ क्रमांक ३, ठाणे |

उप अभियंता यांचे कार्यालय,
राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्रमांक ९,
गोकुळ नगर, गोल्डन डाईज, नवनित मोटार समोर, ठाणे
पीन कोड क्र. ४००६०१ ठाणे

उप अभियंता यांचे कार्यालय,
राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्रमांक ३३,
गोकुळ नगर, गोल्डन डाईज, नवनित मोटार समोर,
शहापूर, मुख्यालय ठाणे
पीन कोड क्र. ४००६०१ ठाणे

उप अभियंता यांचे कार्यालय,
राष्ट्रीय महामार्ग उप विभाग ठाणे,
जिल्हा परिषद, डाक बंगला मुरबाड यांचे शेजारी,
मुख्यालय मुरबाड पीन कोड क्र. ४२१४०१
जि. ठाणे.

## विभागांतर्गत / उप विभाग निहाय तक्ता

| अ. क्र. | मंडळ / विभाग कार्यालय / उप विभागीय कार्यालय |
|---|---|
| १) | **कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे** |
| २) | राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्रमांक ९, ठाणे |
| ३) | राष्ट्रीय महामार्ग उप विभाग क्रमांक ३३, शहापूर, मुख्यालय ठाणे |
| ४) | राष्ट्रीय महामार्ग उप विभाग ठाणे, मुख्यालय मुरबाड. |

## परिशिष्ट - क

### राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३, ठाणे या विभागाच्या कार्यक्षेत्रातील लहान / मोठे पुल यांचे सूची ३१/३/२०१० अखेर लांबी साखळी क्रमांक.

| अ. क्र. | रस्त्याचे नांव | लांबी व साखळी क्रमांक | मोठे पूल | छोटे पूल | मो-या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे भिवंडी बायपास रा. म. क्र. ३ | सा. क्र. ५३९/५०० ते ५६३/१२४<br>एकूण लांबी २३.६२४ | ०३ | ०४ | ९५ |
| २. | कल्याण मुरबाड माळशेज रा. म. क्र. २२२ | सा. क्र. ९/३०० ते ९५/५७०<br>एकूण लांबी ८६.२७० | ०८ | १९ | ३७७ |

## परिशिष्ट ड

### कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा. |
|---|---|---|---|
| १. | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २. | पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र. | केंद्रशासन, राष्ट्रीय महामार्गासाठी | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ३. | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी नाहरकत प्रमाणपत्र | केंद्रशासन, राष्ट्रीय महामार्गासाठी | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ४. | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ५. | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| ६. | सरकारी निवासस्थानी राहणा-या निवृत्त कर्मचा-यांच्या बाबतचे नाहरकत दाखले | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

# सार्वजनिक बांधकाम विभाग

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३,ठाणे** | **ई-मेल eenhd3thn@mahapwd.com<br>eenh3thn@yahoo.co.in<br>फोन :०२२-२५३६८९३८ फॅक्स :०२२-२५३९१४७४** | |
| **सा.बा.आवार, स्टेशन रोड, ठाणे (प) ४००६०१.** | | |
| **जा.क्र.रामवि-३/नागरीकांची सनद/** | | **दि. / /२०१२** |

**प्रति,**
**अधीक्षक अभियंता,**
**ठाणे सा. बां. मंडळ,**
**ठाणे,**

**विषय :- नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत.**

संदर्भ :- मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. ठामं/का-१(२)/३५७९ दि.३०/०५/२०१२

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, शासन पत्र क्र. ३ मधील मुद्दा क्र. १ ते ३ या विभागाशी निगडीत नाही. तसेच मुद्दा क्र. ४ चा समावेश या विभागाच्या नागरीकांच्या सनदेमध्ये करण्यात आलेला आहे.

**सोबत :- मुद्दा क्र. १ ते ४ बाबतचे अभिप्राय.**

**कार्यकारी अभियंता,**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३,**
**ठाणे.करीता**

**स्थळप्रत का.अ.यांनी मान्य केली**

**विषय :- नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत उपरोक्त विषयांतर्गत नोंदणी शाखेचा खुलासा खालील प्रमाणे**

**अ :-** मंत्रालय स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेल्या विभागाच्या सदयस्थितीतील नागरिकांच्या सनदेमध्ये असलेल्या परिशिष्ट ब व क मध्ये कंत्राटदाराच्या नोंदणीबाबत वर्ग १ ते वर्ग ९ वर्गवारी दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये वर्गवारीनुसार अनुदानाची मर्यादा किती याबाबतची तपशिलवार माहिती नसल्याने त्याचा उलगडा होत नाही. याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

**खुलासा :-** या विभागाकडे कंत्राटदाराची नोंदणीची कार्यवाही होत नाही. यास्तव अभिप्राय निरंक आहे.

**विषय :- नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत.**

**उपरोक्त विषयांतर्गत प्रकल्प शाखेची माहिती खालील प्रमाणे.**

नागरीकांची सनद तयार असून २६ फेब्रुवारी २०११ पूर्वी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**मुद्दा क्र. ड :- रस्ते विकास योजनांचा समावेश नागरीकांच्या सनदेमध्ये करणे बाबत.**

खालील प्रमाणे असलेली सदरची माहिती या विभागाच्या नागरीकांच्या सनदेमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हयातील रा. म. ची लांबी दर्शविणारा तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.

**अभिप्राय :-** महाराष्ट्र राज्याची रस्ते विकास योजना ही दर २० वर्षानी कार्यान्वीत करण्यात येते. व सदर योजनेचे १० वर्षाने पुर्नविलोकन करण्यात येऊन सदरहू २० वर्षाची रस्ते विकास योजना अंतिम करण्यात येते. आतापर्यंत सन १९६१-१९८१, १९८१-२००१ या दोन रस्ते विकास योजना पूर्ण झाल्या असून सन २००१-२०११ रस्ते विकास योजना ठाणे सा. बां. मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी तयार केली आहे. सदर योजना शासन स्तरावर मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली आहे. लोकप्रतिनिधींकडून अथवा स्थानिक क्षेत्राकडून काही योजनाबाहय रस्ते अथवा दर्जाव्रत करण्याचे प्रस्ताव योजनेत समाविष्ट करावयाचे असल्यास तसे रस्ते शासनाने ठरवून दिलेल्या निकशानुसार रस्ते विकास योजना मध्यवधी पुर्नविलोकन प्रस्तावांत समाविष्ट करण्यात येतात.

सन २०००-२०११ या कालावधी करीता महाराष्ट्र राज्याची रस्ते विकास योजना शासन स्तरावर मंजूरीसाठी असून, मंजूरीप्राप्त झाल्यानंतर सदर रस्ते विकास योजना नागरीकांच्या माहितीसाठी सा. बां. खात्याचे संकेत प्रसिध्द स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी व तसे नागरीकांच्या सनदेमध्ये नमूद करावे असे या कार्यालयाचे मत आहे.

**मुद्दा क्र. ब :- पेट्रोलपंप आणि पेट्रोलपंपाच्या पोहाच मार्गाचे नाहरकत प्रमाणपत्र शासन स्तरावर देण्यात येते याबाबतची तपासणी करुन तसे अधिकार क्षेत्रीय स्तरावर देण्यात येतील किंवा कसे याबाबत निर्णय घेऊन तसे बदल करण्यात यावे.**

**अभिप्राय १ :-** रा. म. संपादीत केलेल्या सर्व मालमत्ता केंद्रशासनाच्या अखत्यारीत येतात. ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारीत नाही.

२ :- तसेच राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत केलेल्या सर्व मालमत्ता केंद्रशासनाच्या अख्यत्यारीत येतात. यास्तव सर्व प्रकारचे नाहरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव केंद्रशासनस्तरावर मंजूर होतात. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर अधिकार देऊन त्यात बदल करण्याची बाब राज्यशासनाच्या अख्यत्यारीत येत नाही.

**अभिप्राय १ :-** सदयस्थितील सा. बां. मालकीच्या राज्य मार्ग / प्रमुख राज्य मार्ग/ प्रमुख जिल्हा मार्ग / इतर जिल्हा मार्ग इत्यादी वरुन पेट्रोलपंप/हॅाटेल/धाबे/रिसॅार्ट/सर्विस स्टेशन इ. खाजगी मिळकतींना पोहच मार्गाकरीता नाहरक प्रमाणपत्र व त्यांचे आराखडयांना मंजूरी देण्याबाबतचे प्रस्ताव परवाना अधिका-यांकडून प्राप्त झाल्यानंतर सदरहू प्रस्ताव शासन सा. बां. विभाग, मंत्रालयाचे पत्र क्र. आरबीडी/२००१/प्र.क्र.२२/रस्ते-७/दि.३१/७/२००१ अन्वये शासनास सादर केली जातात. व राष्ट्रीय महामार्गाचे अशा प्रकारचे प्रस्ताव विहीत मार्गाने मुख्य अभियंता, मुंबई सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे मार्फत केंद्र शासनाच्या अखत्यारीत Ministry of Road Surface Transport (MORST) नवी दिल्ली येथे मंजूरीसाठी सादर करण्यात येतात.

सदरचे प्रस्ताव मंजूरीसाठी राज्यशासनाकडे अथवा केंद्रशासनाकउे सादर करतांना प्रथम क्षेत्रीय कार्यालयातर्फे जागेची पहाणी करुन उप विभाग, विभागीय कार्यालय, मंडळ कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांच्या अभिप्रायानुसार आवश्यकत्या कागदपत्रांसह सादर करण्यात येतात. मात्र सदरहू प्रस्तावामध्ये कांही त्रुटी आढळून आल्यास किंवा काही कागदपत्रांची पुर्तता पूर्णपणे न झाल्यास सदरचे प्रस्ताव मुद्दयांचे पुर्ततेसाठी क्षेत्रीय कार्यालयास परत माघारी पाठविली जातात. त्यामुळे अर्जदारास अथवा नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागतो व त्याचा पैसा व वेळ वाया जातो. यामुळे या खात्याला नागरीकांच्या रोषास सामोरे जागे लागे. या कारणास्तव अशाप्रकारचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार हे जिल्हा पातळीपर्यंत मंडळ स्तरावर देण्यात यावेत असे या कार्यालयाचे मत आहे.

तथापी असे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करताना क्षेत्रीय कार्यालयाने (उप विभाग व विभागीय कार्यालय) याबाबत सर्व शासन निर्णयांच्या नियमांचे काटेकोरपणे अभ्यास करुन प्रस्तावासाठी लागणारे कागदपत्रे, आराखडे अचुकपणे असल्याची खात्री करुन त्यानंतरच आपल्या शिफारशीने प्रस्ताव मंडळ स्तरावर सादर करावेत जेणेकरुन नागरीकांची कामे समाधानकारक होतील. याकरीता सदरहू प्रस्तावासाठी लागणारी आवश्यकत्या कागदपत्रांची यादी शासन निर्णय, शासन नामावली, प्रश्नावली व विवीध प्रकारचे नमुने नागरीकांच्या सनदे मध्ये प्रसिध्द करणे आवश्यक वाटते. त्यामुळे विषयांकित प्रस्तावाबाबत नागरीकांपर्यंत जास्ती जास्त माहिती उपलब होऊन त्यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव माडले जाऊन एक प्रकारे शासनास मदत होईलच परंतु लोकभिमुख शासन असल्याचे नागरीकांमध्ये समाधान प्राप्त होईल.

# सार्वजनिक बांधकाम विभाग



| कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,<br>राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३,ठाणे<br>सा.बा.आवार, स्टेशन रोड, ठाणे (प) ४००६०१. | ई-मेल eenhd3thn@mahapwd.com<br>eenh3thn@yahoo.co.in<br>फोन :०२२-२५३६८९३८ फॅक्स :०२२-२५३९१४७४ |
|---|---|
| जा.क्र.रामवि-३/नागरीकांची सनद/ | दि. / /२०१२ |



**प्रति,**
**अधीक्षक अभियंता,**
**ठाणे सा. बां. मंडळ,**
**ठाणे,**

**विषय :- <u>नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत.</u>**
संदर्भ :- मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. ठामं/का-१(२)/३५७९ दि.३०/०५/२०१२

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वदारे नागरिकांची सनद पुस्तिका सन २०११ व सन २०१२ पुस्तीका तयार केलेली होती. सदर सनद प्रसिध्द करण्यासाठी आय. टी. सी. पूणे यांचेकडे सादर करण्यात आली होती. त्यांनी सदर सनद विभागीय स्तरावरुन प्रसिध्द करण्याच्या सूचना दिल्या. परंतू विभागीय स्तरावरुन सनद संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात संगणकाच्या कांही तांत्रिक अडचणी आल्यामुळे सनद तयार असूनही प्रसिध्द करता येऊ शकली नाही.

या विभागाची नागरीकांची सनद पुस्तिका सन २०११ व सन २०१२ पुस्तिका तयार असून सा. बां. विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने आय. टी. सी. पुणे यांच्या संपर्क साधला असता त्यांनी प्रादेशिक विभागाचा Login ID व पासवर्ड वापरूनच सदर सनद सा. बां. विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करता येईल.असे सागितले.

तरी या विभागाची नागरिकांची सनद मुख्य अभियंता यांच्या कार्यालयातून सा. बां. विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी यापत्रासोबत (सॅाफट कॅापीसह) सादर करण्यात येत आहे. याविषयी प्रादेशिक विभागातून पुढील कार्यवाही करून घण्यासाठी कपया आपल्या स्तरावर प्रादेशिक कार्यालयास लिहावे ही विनंती.

सोबत :- नागरीकांची सनद पुस्तिका व सॅाफ्ट कॅापीसह

**कार्यकारी अभियंता,**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३,**
**ठाणे.**

प्रत :- मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई, यांना माहितीसाठी सविनय सादर.

२/वरीलप्रमाणे या विभागाची_नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यासाठी या कार्यालयाचा विशेष दूत soft copy सह पाठविण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग क्रमांक ३,
ठाणे.करीता

स्थळप्रत का.अ.यांनी मान्य केली